**<u>नियमित दिवाणी दावा नं. ७०/२०१४</u>**

**<u>निशाणी क्रमांक १७३ वरील आदेश</u>**

**<u>सी.एन.आर.क्र. MHK0110002052014</u>**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम १० अन्वये दाव्याकामी पक्षकार (वादी) म्हणून सामिल करण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदार यांचे असे कथन आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द वाटप व निरंतर मनाईकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत दावेमध्ये वादी यांनी पुरावे दाखल वंशावळ सादर केलेली आहे. सदरचे वंशावळी मधील खेमा (मयत) यांचे वारस म्हणून जगन्नाथ, सुशिला, गंगुबाई कस्तूरी (मयत) व आक्काताई (मयत) असे वारसांची नावे नोंद केलेले दिसून येत आहे. तसेच वादी यांनी सदरचा दावा त्यांचे ७/१२ सदरी असलेल्या नावाप्रमाणे दाखल केलेला आहे. वादी व अर्जदार यांची नावे वारसा फेरफार क्र.७२ अन्वये सदरचे वाद मिळकतीस दाखल करणेत आलेली होती. परंतू सदरचे नाव वारसा फेरफार मध्ये दाखल करताना जगन्नाथ खेमा घाटगे (अपाक आई पुतळाबाई ए.कु.) म्हणून नाव दाखल करण्यात आले आहे.

**०३.** सदरचं वारस फेरफार क्र.७२ नुसार ७/१२ सदरी अंमल देण्यात आला होता. तसेच वादी हे सज्ञान झालेवर त्यांचे नावापुढील (अपाक आई पुतळाबाई ) शेरा कमी करण्यात आला. त्यानंतर वादी यांना कस्तूरी, सोनाबाई, आक्काबाई, गंगूबाई व सुशिला नावाचे बहिन आहेत. त्यामुळे वादी यांना असणारे बहिनींना आवश्यक ते पक्षकार म्हणजेच वादी म्हणून समाविष्ठ करणे गरजेचे आहे. वादी यांनी अर्जदार यांना त्यांचे ७/१२ सदरी नाव नसल्यामुळे वादी म्हणून समाविष्ठ केले नाही

असे दिसून येते. परंतू आजरोजी देखिल या अर्जदार यांनी वाद मिळकती मधील वादी यांचेबरोबर असणारा त्यांचे समान हिस्सा व हक्क यापुर्वी कधीही सोडलेला नाही . त्यामुळे अर्जदार यांना आवश्यक ते वादी यांचे बरोबर पक्षकार होणे गरजेचे आहे. वादी यांचे आक्काताई, सोनाबाई व कस्तूरीबाई या बहिनीचा मृत्यू झाले कारणाने वाटपाचे दावे कामी त्यांचे वारसांना आवश्यक ते पक्षकार करणे गरजेचे आहे. सबब, वरीलप्रमाणे वादी म्हणून दाखल करणेबाबत अर्जदार यांनी विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास तिव्र विरोध केलेला व त्यांनी सदर अर्जातील मजकुर चुकीचा व खोटा असल्याचे कथन केले आहे. सदर अर्ज वादी यांच्या वारसांना त्रास देनेचे हेतूने व काम प्रलंबित ठेवण्याचे हेतूने दाखल केला आहे. सदर अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती केली आहे. तसेच सदर मिळकत ही वादी यांच्या मालकीची आहे तसेच अर्जदार यांचा वाद मिळकतीशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे अर्जदार यांना याकामी पक्षकार करता येणार नाही. त्यामुळे त्यांनी सदर अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांचे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला. त्रयस्त अर्जदार यांचा निशाणी १७९ नुसार लेखी युक्तीवाद असा की, त्रयस्त पक्षकार यांनी सदरचे दावेचे कामी वादी म्हणून समाविष्ठ करणेकामी अर्ज दाखल केला आहे. सदर कामी वादी व प्रतिवादी यांना म्हणणे दाखल करणेकामी दिनांक २६/०९/२०२३ रोजी आदेश झाले आहे. सदर कामी प्रतिवादी क्र.१० व ६(ई) यांनी अर्ज मंजूर करणेस हरकत नाही असे म्हणणे दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दिनांक ०८/०४/२०२४ अखेर त्यांचे म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यांच्या विरुद्ध विना म्हणणे आदेश पारित करण्यात आला आहे. त्रयस्थ पक्षकार यांचे

मार्फत साादर करण्यात आलेला अर्जामधील अ.क्र. १(१) ते ३(२) हे वादी यांचे बहिन अनुक्रमे कस्तुरीबाई, आक्काताई आणि सोनाबाई यांचे वारस आहेत. अर्जामधील अ.क्र.४ व ५ या वादी यांचे बहिनी आहेत.

**०५.** त्रयस्थ अर्जदार वादी यांचे नातेवाईक/बहिणी असल्याबाबत वादी यांचे वडील खेमा बाळा घाटगे यांचे मृत्यू नंतर घेणेत आलेल्या फेरफार क्र.७२ ची प्रमाणित प्रत आणि आक्काताई, सोनाबाई आणि कस्तुरीबाई यांचे मृत्यू दाखल निशाणी क्र.१७२ वर सादर केलेले आहेत.

**०६.** अर्जदार आणि वादी हे बहिन भाऊ असलेबाबत आणि कै. खेमा बाळा घाटगे यांचे वारस असल्याबाबत वादी यांचे तर्फे साक्षीदार म्हणून या दाव्याचे कामी निशाणी क्र.१६० वर सुंदर शामराव पांढरे यांचे मार्फत दाखल करणेत आलेल्या ॲफिडेव्हीट मधील कलम ४ मध्ये खेमा बाळा घाटगे यांची वंशावळ सादर करण्यात आलेली आहे. तसेच ॲफिडेव्हीट चे कलम १० मध्ये श्रीमती गंगुबाई शामराव पांढरे, श्रीमती सोनाबाई आण्णासो कांबळे, कस्तुरीबाई उत्तमराव गायकवाड, सौ. सुशिला सावंत कांबळे, आक्काताई विष्णू अवघडे यांचा वादी यांचे सोबत गट क्र.६५० मध्ये वडीलार्जित हिस्सा आहे अशी साक्ष देण्यात आलेली आहे.

**०७.** निशाणी क्र.१६० वरील ॲफिडेव्हीट प्रमाणे साक्षीदार यांचे उलटतपासामध्ये देखिल ॲफिडेव्हीट मधील साक्षीप्रमाणे वादी, आक्काताई, सोनाबाई, सुशिला, गंगुबाई आणि कस्तुरीबाई हे खेमा बाळा घाटगे यांचे वारस असलेबाबत कबुल केले आहे. तसेच सदरची मिळकत ही वारसा हक्काने आली असलेबाबत उलटतपासासमध्ये कबुल करण्यात आले आहे.

**०८.** वादी यांनी सदरचे दावेचे कामी निशाणी क्र.१२५ वर सरतपासासचे कामी दाखल ॲफिडेव्हीट वरील उलटतपासाचे वेळी दिनांक ४/०२/२०१९ रोजी देखिल 'माझ्या नावाची नोंद वारसा हक्काच्या पद्धतीने करण्यात आली. माझे वडील खेमा यांना वारस म्हणजे मी स्वता व ५ बहिणी आहेत. माझ्या वहिणींचे नावे आक्काताई विष्णू अवघडे, सोनाबाई आण्णाप्पा कांबळे, सुशिला सावंता कांबळे, गंगुबाई शामराव पांढरे व कस्तूरा उत्तम गायकवाड अशी आहेत. ज्या बहिणी मयत आहेत त्यांना वारस आहेत. दावा मिळकतीमध्ये मी व माझ्या बहिणी असे वारस आहेत. माझ्या बहिणी असल्यामुळे त्यांचा हिस्सा दावा मिळकतीमध्ये येतो.' अशा प्रकारे कबुली वादी यांनी दिलेली आहे.

**०९.** प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी देखिल दावेचे कामी वादी यांनी त्यांचे इतर बहिनी यांना आवश्यक ते पक्षकार केले नसलेबाबत हरकत दाखल केली आहे. सदर दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी या न्यायालयात रे.क.नं.०५/२०२२ मधील दाव्यायमध्ये गट क्र.६४५ मध्ये वाटपाकरीता दावा दाखल केला आहे. त्यामध्ये देखिल अर्जदार यांच्यामार्फत सदर दाव्यातील प्रतिवादी म्हणून समाविष्ठ करणेकामी सादर करण्यात आलेला निशाणी क्र.६२ वरील अर्ज मंजूर करण्यात आला.

**१०.** एकंदरित अर्जदार यांचा अर्ज, वादी यांचे निशाणी क्र.१२५ वरील उलटतपास आणि वादी यांचे साक्षीदार यांची निशाणी क्र.१६० वरील उलटतपासामध्ये आणि फेरफार क्र.७२ नुसार अर्जदार आणि त्यांचे पुर्वहक्कदार हे खेमा बाळा घाटगे यांचे वारस असलेबाबत आणि सदरचे मिळकती मध्ये त्यांचा हिस्सा असलेबाबत सिद्ध होत आहे. वादी आणि अर्जदार यांचा वाटप करुन मागणेत आलेला मिळकती मध्ये हक्क व हिस्सा असलेमुळे अर्जदार यांचा अर्ज मंजूर होणे आवश्यक आहे.

**११.** संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द वाटपाकरीता तसेच कायम मनाई करीता दाखल केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तुतचा अर्ज त्रयस्थ पक्षकार यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १ नियम १० अन्वये वादी म्हणून सामिल करून घेणेबाबत दाखल केलेला आहे.

**१२.** दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश १ नियम १०(२) अन्वये ज्या व्यक्तीला वादी म्हणून किंवा प्रतिवादी म्हणून सामील करून घ्यावयास हवे होते किंवा दाव्यामध्ये गुंतलेल्या सर्व प्रश्नांचा परिणामकारकरित्या व पूर्णपणे अधिनिर्णय करून ते निकालात काढणे न्यायालयास शक्य होण्यासाठी ज्या व्यक्तीची न्यायालयासमोर हजेरी आवश्यक असेल त्या व्यक्तीला आवश्यक पक्षकार म्हणून दाव्याकामी सामील करता येते. त्रयस्त अर्जदार यांच्या अर्जातील कथनांवरुन व तर्फे विधीज्ञांच्या युक्तीवादावरून प्रथमदर्शनी ते प्रस्तुत दाव्याकामी आवश्यक पक्षकार वाटतात. तसेच या दाव्याचा न्यायनिर्णय त्यांच्या न्याय हक्कावर परिणाम करणारा देखील असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्रयस्थ अर्जदार सदरची बाब ही न्यायालयासमोर शपथपत्राने कथन करतात. त्रयस्थ अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याकामी सामील करून घेतले तर वादी अथवा प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. परंतू सामील न केल्यास त्रयस्थ अर्जदार यांचे नुकसान होवू शकते. तसेच प्रस्तुत दाव्याचा अंतिमरित्या न्यायनिर्णय होण्याच्या दृष्टीने तसेच प्रकरणाचे बाहुल्य टाळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायोचित वाटते. सबब, वरील सर्व कारणांचा व अभिलेखाचा तसेच प्रस्तुत दाव्याच्या स्वरूपाचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

# आ दे श

१. त्रयस्त अर्जदार यांचा प्रस्तुतचा  निशाणी क्रमांक १७३ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. त्रयस्त अर्जदार यांना प्रस्तुत दाव्याकामी वादी म्हणून सामील करण्यात येत आहे.

३. वादी यांनी वरीलप्रमाणे दुरुस्ती निशाणी क्र. १ येथे प्रस्तुत आदेशापासून १४ दिवसाच्या आतमध्ये सदरची दुरुस्ती करणेची आहे व निशाणी क्र. १ ची दुरूस्त प्रत दाखल करण्याच्या आहेत.

४. दाव्याचा खर्च मुळ अर्जामध्ये समाविष्ठ करण्यात येतो.

SANDEEP DEVIDAS SONAWANE
Digitally signed by SANDEEP DEVIDAS SONAWANE
Date: 2024.07.18 14:44:48 +0530

**पेठ–वडगांव.** **( एस. डी. सोनवणे )**
**दिनांक १२/०७/२०२४** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**